ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने
शिक्षा अंतिम करणे बाबत. (श्री.पोपट मोतीलाल मेहेरे
तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत-लौकी /उक्कडगाव
पंचायत समिती कोपरगाव)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/९८३ /२०२५ /९८७५०३ए०
दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

संदर्भ :-१. या कार्यालयाकडील दोषारोपपत्र / ज्ञापन क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/५३१/२०२३ दिनांक-१९/०७/२०२३
२. या कार्यालयाकडील आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/६१२/२०२३ दिनांक-११/०८/२०२३ (चौकशी अधिकारी नियुक्ती)
३. सहा.आयुक्त (चौकशी), नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्र. विशा.४/खाचौ /सी.आर.१५४/२०२३, दिनांक- २९/११/२०२४, प्राप्त दिनांक ११/०२/२०२५
४. विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सात मधील परिशिष्ठ ७.१
५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ ( २ )
६. ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन परिपत्रक डीएनई-५९०/ सीआर- १८४/२० दिनांक ८ मे १९९१.
७.या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र.११८८०५९,दि.२८.०४.२०२५
८. श्री.पोपट मोतीलाल मेहेरे यांचा खुलासा दिनांक १५/०५/२०२५

संदर्भ क्रमांक ०१ अन्वये, श्री.पोपट मोतीलाल मेहेरे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत काकडी तालुका कोपरगाव यांना त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरशिस्त व गैरवर्तन केल्याने दोषारोपपत्र बजावणेत आले होते.

संदर्भ क्रमांक ०२ नुसार श्री.पोपट मोतीलाल मेहेरे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी यांचे गैरतर्वना विरुध्द विभागीय चौकशी सुरु करणे कामी चौकशी अधिकारी यांची नेमणुक करणेत आली होती.

संदर्भ क्रमांक.३ नुसार सहाय्यक चौकशी अधिकारी नाशिक विभाग नाशिक यांनी चौकशी पुर्ण करुन चौकशी अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. चौकशी अहवालामध्ये खालील प्रमाणे आरोपांच्या चौकशीचे निष्कर्ष नोंदविणेत आलेले आहेत.

चौकशी अहवालाचा निष्कर्ष गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| आरोप क्रमांक | विभागीय चौकशी अहवालातील निष्कर्ष |
|---|---|
| आरोप क्र.१ | आरोप सिध्द होत नाही. |
| आरोप क्र.२ | आरोप सिध्द होत नाही. |
| आरोप क्र.३ | आरोप अंशत: सिध्द होतो. |
| आरोप क्र.४ | आरोप सिध्द होत नाही. |
| आरोप क्र.५ | आरोप अंशत: सिध्द होतो. |
| आरोप क्र.६ | आरोप सिध्द होत नाही. |

| आरोप क्र.७ | आरोप सिध्द होत नाही. |
|---|---|

वरीलप्रमाणे श्री.पोपट मोतीलाल मेहेरे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी यांचे वर चौकशी करण्यात आलेल्या ०७ दोषारोपांपैकी ०२ दोषा आरोप विभागीय चौकशी मधे अंशत: सिध्द झालेले आहेत व ०७ पैकी ०५ दोषारोप सिध्द झालेले नाहीत. विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सात मधील ७.१ नुसार चौकशी अहवालास सहमती दर्शविलेली असल्याने श्री पोपट मोतीलाल मेहेरे यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामकाजात गैरवर्तन करुन, महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केलेला आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (२) नुसार एक वेतनवाढ कायमस्वरुपी थांबविण्याची शिक्षा अंतिम का करण्यात येऊ नये? या बाबतची नोटीस देण्यात आलेली आहे. खुलासा सादर न केल्यास अंतिम कारणे दाखवा नोटीस मध्ये नमुद केलेली शिक्षा तुम्हांस मान्य आहे, असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल असे कळविण्यात आलेले आहे. संदर्भ क्रमांक ०८ अन्वये श्री.पोपट मोतीलाल मेहेरे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत लौकी/उक्कडगाव तालुका कोपरगाव त्यांनी याप्रकरणी खुलासा सादर केलेला आहे . श्री.पोपट मोतीलाल मेहेरे यांचे खुलाश्याचे अवलोकन करता प्राप्त खुलासा प्रशासकीय दृष्टया असमर्थनिय ठरत असल्याने अमान्य करण्यात येत आहे . सबब, श्री पोपट मोतीलाल मेहेरे यांना देण्यात आलेल्या अंतिम कारणे दाखवा नोटीसमधील नमुद केलेली पुढील एक वेतनवाढ कायमस्वरुपी थांबविणे शिक्षा या आदेशान्वये अंतिम करण्यात येत आहे. सदर आदेशाची नोंद संबधिताचे सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५१००८०६०७३८ असा आहे.

Signed by Anand
Subhashlal Bhandari
Date: 09-10-2025 21:22:34

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत:-

श्री.पोपट मोतीलाल मेहेरे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत लौकी/ उक्कडगाव ता.कोपरगाव

द्वारा गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर.

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती, श्रीगोंदा

२/- सदर आदेशाची नोंद संबधिताच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.